**(लोगो)**

गोवा सरकार

**महिला आणि बाल कल्याण संचालनालय**

शांता इमारत, पहिला मजला, सांतिनेज

पणजी, गोवा.

फॅक्स :- (0832) 2424238 फोन :- (0832) 2235308 / 2426112 ई-मेल :- dir-wcd.goa@nic.in

1. क्र. 2 / 279 / LL/ 2012 / DW&CD / दि. :30/ 04/ 2013

ज्याअर्थी, गोवा सरकारने 06 / 07 / 2012 या दिवशी क्र. 2 / 279 / एलएल / 2012 / डीडब्ल्यू अँड सीडी / 2562 या अधीसूचनेद्वारे क्र. 16, मालिका- I, दि. 19 /07/2012 या दिवशी लाडली लक्ष्मी योजना राजपत्रात प्रसिद्ध केली.

आणि ज्याअर्थी, नंतर अधीसूचना क्र. 2 /279 /एलएल/2012 /डीडब्ल्यू अँड सीडी /2969 ता. 07/08/2012 अंतर्गत त्यात दुरुस्ती करून क्र. 19, मालिका- I, ता. 09 /08/2012 या दिवशी राजपत्रात प्रसिद्ध केली., आणि अधीसूचना क्र. 2 /279 /एलएल/2012 /डीडब्ल्यू अँड सीडी /4162 दि.. 22/04/2013 रोजी क्र. 4, मालिका- I, दि. 25 /04/2013 या दिवशी राजपत्रात प्रसिद्ध केली.

त्याअर्थी, सरकार आता ही लाडली लक्ष्मी योजना नव्याने प्रसिद्ध करीत आहे. ती पुढे दिल्यानुसार आहे :

# लाडली लक्ष्मी योजना

## योजनेचा उद्देश

आमच्या समाजात, जेथे मुलीचा जन्म म्हणजे आई-वडिल किंवा पालकांसाठी प्रचंड आर्थिक ओझे समजण्यात येते. त्यातून मुलीच्या जन्माआधीच तिची हत्या करण्याची प्रवृत्ती वाढीस लागते. ही प्रवृत्ती नष्ट व्हावी आणि राज्यात मुलींचे प्रमाण वाढण्यास आधार मिळावा, त्याचप्रमाणे मुलगी म्हणजे पालकांसाठी आर्थिक ओझे ठरू नये, या उद्देशाने ही योजना तयार करण्यात आली आहे. तसेच मुलीचा विवाह म्हणजे आई-वडिल अथवा पालकांसाठी ओझे ठरू नये हाही उद्देश ही योजना कार्यवाहित आणण्यामागे आहे. त्याचबरोबर ही योजना म्हणजे हुंडा पद्धतीस प्रेरणा, प्रोत्साहन देणारी आहे, असा गैरसमज कोणत्याही प्रकारे कुणी करून घेऊ नये.

**1 : संक्षिप्त नाव आणि प्रारंभ -**

(1) या योजनेस **'लाडली लक्ष्मी योजना'** असे संबोधण्यात येईल.

(2) ही योजना तात्काळ कार्यवाहित येईल.

**2 : पात्रता आणि अन्य अटी :-**

(1) पुढील अटींची पूर्तता करणारी **कोणतीही मुलगी (युवती, तरुणी)** अर्ज करण्यास पात्र आहे :

(ए) गोव्यात जन्म.,

(बी) कमीत कमी गत 15 वर्षे गोव्यात वास्तव्य., आणि

(सी) (i) जिची आई अथवा वडिल यांच्यापैकी एकाचा जन्म गोव्यात झालेला आहे आणि गत 15 वर्षापासून गोव्यात वास्तव्य आहे., किंवा

(ii) जिची आई अथवा वडिल यांच्यापैकी एकाचे गत 25 वर्षे गोव्यात वास्तव्य आहे.

असे असले तरीही, एखादी मुलगी किंवा तरुणीचा जन्म गोव्याबाहेर झालेला असूनही पुढील अटींची पूर्तता करीत असल्यास योजनेसाठी पात्र ठरू शकते :

(ए) कमीत कमी गत 15 वर्षे गोव्यात वास्तव्य आहे.,

(बी) गोव्यात शिक्षण., आणि

(सी) (i) जिची आई अथवा वडिल यांच्यापैकी एकाचा जन्म गोव्यात झालेला आहे आणि गत 15 वर्षापासून गोव्यात वास्तव्य आहे., किंवा

(ii) जिची आई अथवा वडिल यांच्यापैकी एकाचे गत 25 वर्षे गोव्यात वास्तव्य आहे.

(2) कोणत्याही पात्रतेसंबंधी संशय निर्माण झाल्यास पुढील सदस्यांची समिती अशा प्रश्नावर निर्णय घेईल :

(i) महिला आणि बालकल्याण खात्याचा ताबा असलेला गोवा सरकारचा सचिव या समितीचा अध्यक्ष असेल,

(ii) सरकारने सदस्य म्हणून नियुक्त केलेला एखादा समाजसेवक,

(iii) अर्थखात्याचा ताबा असलेला गोवा सरकारचा अतिरिक्त/ संयुक्त सचिव – सदस्य, आणि

(iv) महिला आणि बालकल्याण खात्याचा संचालक – सदस्य सचिव.

(3) या समितीचा निर्णय अंतिम आणि सर्वांवर बंधनकारक असेल. योजने अंतर्गत त्या निर्णयाचा फेरविचार करण्याची विनंती अथवा अपील करता येणार नाही.

(4) अनाथ किंवा विनाआश्रित, अनैतिक संबंधांतून जन्मलेले, दत्तक घेतलेले मूल किंवा या योजनेखाली समावेश होणाऱ्या अन्य तरुणी यांच्याकडून प्राप्त सर्व अर्ज, पालक अथवा त्यांचा सांभाळ करणारी संस्था यांच्यामार्फत आलेले असतील तर, ते सर्व अर्ज उपरोल्लेखित समितीकडे पाठवावे लागतील.

(4) (अ) विवाहास कुटुंबियांचा विरोध वगैरे असल्यामुळे एखादी तरुणी जर पालकांचा जन्म, वास्तव्य, आदी दस्तऐवज सादर करण्यास असमर्थ असेल, तर असे अर्ज अंतिम निर्णयासाठी समितीकडे पाठवावे.

(5) पुढे दिल्यानुसार लाभार्थींची दोन गटात विभागणी करण्यात येईल :–

(ए) 01.04.2012 रोजी किंवा त्यानंतर वयाची 18 वर्षे पूर्ण करणारे अर्जदार, आणि

(बी) 01.04.2012 पूर्वी वयाची 18 वर्षे पूर्ण करणारे 19 ते 40 वर्षे वयोगटातील अर्जदार.

3. **कार्यपद्धत :–** (1) या योजनेखालील लाभार्थींना, महिला आणि बाल कल्याण खात्याचे संचालक आणि अर्जदार (तरुणी) यांच्या संयुक्त नावावरील बँक कायम ठेवीच्या स्वरुपात एक लाख रुपये आर्थिक आधार देण्यात येईल.

(2) या योजनेतील तरतुदीनुसार अर्जदार दावा करीत नाही तोपर्यंत किंवा वयाची 40 वर्षे पूर्ण होत नाहीत तोपर्यंत, यापैकी जे प्रथम असेल ते, कायम ठेवीच्या जमा झालेल्या व्याजासह प्रतिवर्षी आपोआप नुतनीकरण होईल.

या योजनेची बँक/ आर्थिक संस्थेतर्फे कार्यवाही करण्याच्या उद्देशाने सरकार सामंजस्य करार करेल. त्या करारात बँक खाते चालविणे, कायम ठेव रक्कम / प्रमाणपत्र, व्याजदर, लाभार्थींना रक्कम देणे, बँक / आर्थिक संस्थेस सरकारने निधी देणे, एखादे खाते बंद केल्यानंतर सरकारला देय असलेली रक्कम हा सर्व तपशील नमूद करेल.

**4. अर्ज करण्याची पद्धत :–** (1) 1 एप्रिल 2012 रोजी किंवा त्यानंतर वयाची 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या अर्जदारानी (योजनेच्या कलम 2(5)(ए) अंतर्गत समावेश होणाऱ्या तरुणी) सरकारने निर्धारित केलेल्या खालील (योजनेच्या **जोडपत्र –I** नुसार) नमुन्यात संचालक, महिला आणि बाल कल्याण खाते, पणजी–गोवा, यांच्याकडे अर्ज करावा. अर्ज पूर्ण भरलेला असावा, सोबत पासपोर्ट आकाराचे दोन फोटो आणि पुढील कागदपत्रे सादर करावी :

i) अर्जदाराच्या जन्मदाखल्याची प्रमाणित प्रत.

ii) अर्जदाराचे 15 वर्षे गोव्यात वास्तव्य आहे हे सिद्ध करणारा एखाद्या पुरावा दस्तऐवजाची प्रमाणित प्रत. निवास दाखल्याच्या बदली पूर्वीची शाळा सोडल्याचा दाखला आणि सध्या तरुणी शिक्षण घेत असलेल्या मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेचे अधिकृत (बोनाफाईड) विद्यार्थी प्रमाणपत्र सादर करता येईल. असे असले तरीही, ज्या तरुणीने मध्येच शाळा सोडलेली आहे, त्यांनी शाळा सोडलेल्या दिवसापासून ते 18 वर्षे पूर्ण / विवाह होईपर्यंतचा, (जे लागू असेल ते) निवास दाखला सादर करता येईल. पदवीधर असल्यास दहावी, बारावी आणि पदवी प्रमाणपत्र एवढा पुरावा पुरेसा असेल.

iii) पालकांचा 15 किंवा 25 वर्षांचा निवास दाखला. यामधील जे लागू असेल ते. निवास दाखल्याच्या बदली, निर्धारित कालावधीसाठी निवास असल्याचे सिद्ध करणारा अन्य कोणताही पुरावा, ज्यात पुढे दिलेल्या दाखल्यांचा समावेश असू शकतो.

(ए) जमीन नोंदणी कागदपत्र : कूळ हक्क, मुंडकार हक्क, ताबा हक्क, आदि.,

(बी) रोजगार प्रमाणपत्र, अथवा.,

(सी) समितीचे समाधान होईल असा अन्य कोणताही दाखला.

iv) पालक / पालकांचा जन्म दाखला. जन्म दाखला उपलब्ध नसेल तर, पालकांची जन्म तारीख आणि जन्मस्थळ सिद्ध करणारा पुढील एखादा दाखला सादर करता येईल.

(ए) बाप्तीज्म दाखला.,

(बी) पालक / पालकांचा शाळा सोडल्याचा दाखला.,

(सी) पालकानी जन्म तारखेचा जो दावा केला आहे, त्या अंदाजास अर्जदार तरुणीचे आजोबा अथवा आजी यांपैकी एखाद्याचे गोव्यात वास्तव्य होते हे सिद्ध करणारा एखादा दाखला, अथवा.,

(डी) पालक / पालकांची जन्म तारीख सिद्ध करणारा अन्य कोणताही दाखला.

v) आधारकार्ड असल्यास त्याची प्रमाणित प्रत, आणि

vi) या योजनेच्या (**जोडपत्र –II**) नमुन्या मधील प्रतिज्ञापत्र.

vii) एखाद्या प्रकारात एखाद्या तरुणीचे वडिल / आई राज्य सरकार, केंद्र सरकार अथवा सरकारी नियंत्रणातील सार्वजनिक आस्थापन यामधील कर्मचारी असल्यास निवास दाखल्याच्या बदली, असे अर्जदार खाते प्रमुखाने दिलेले 25 वर्षांचे सेवा प्रमाणपत्र सादर करू शकतात. असे असले तरीही, सदर तरुणीचा जन्म गोव्यातच झालेला असावा तसेच तिचे दहावीपर्यंतचे शिक्षण गोव्यातच झालेले असावे.

**सूचना 1 :–** 01.04.2013 नंतरच्या सर्व अर्जदाराना आधारकार्ड सक्तीचे असेल. असे असले तरीही, खास आदेश जारी करून सरकार आधारकार्ड अथवा अन्य दाखले सादर करण्याची अट आणखी काही कालावधीसाठी शिथील करू शकेल.

**सूचना 2 :–** प्रत्येक अर्जास (**जोडपत्र –I**) अनुक्रमांक असेल. हे अर्ज महिला आणि बाल कल्याण संचालकाकडून अधिसूचीत अधिकारी / निर्धारित बँकातून उपलब्ध असतील. अन्य कोणत्याही नमुन्यातील अर्ज अथवा अर्जाची छापील प्रत स्वीकारली जाणार नाही.

**सूचना 3 :–** अर्जदाराने (**जोडपत्र –I**) मधील अर्जावर आमदार, खासदार, सरकारी अधिकारी (गोवा सरकारचा अतिरिक्त / खास सचिव या हुद्द्या खालील अधिकारी नसावा) अथवा जिल्हाधिकारी यांच्या समक्ष सही करावी लागेल.

(2) 01.04.2012 या तारखेपूर्वी 18 वर्षे अथवा त्यापेक्षा जास्त वय पूर्ण झालेल्या लाभार्थींच्या बाबतीत (वरील योजनेच्या कलम 2(5)(बी) अंतर्गत समाविष्ट लाभार्थी) लग्न झालेले आहे अथवा भविष्यात व्हायचे असेल तर त्यांना **जोडपत्र –I** सोबत दिलेल्या निर्धारित नमुन्यात, महिला आणि बाल कल्याण संचालक, पणजी–गोवा यांच्याकडे अर्ज करता येतील. अर्जासोबत वरील कलम 4(1) त नमूद करण्यात आलेले सर्व दस्तऐवज तसेच पुढे नमूद करण्यात आलेली अतिरिक्त कागदपत्रेही सादर करावी लागेल.

i) लग्न नोंदणी दाखल्याची प्रमाणित प्रत. (प्रथम नोंदणी दाखल्याची प्रतही सादर करावी). मात्र हा दाखला ता. 01.04.2012 रोजीचा अथवा त्यानंतरचा असावा.

(3) ही योजना राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिवसापासून किंवा 18 वर्षे पूर्ण झाल्यानंतर अथवा विवाह नोंदणी दाखला मिळाल्यानंतर 180 दिवसांच्या आत अर्ज सादर करावा लागेल. 180 दिवसानंतर प्राप्त सर्व अर्ज फेटाळण्यात येतील.

(4) आवश्यक दाखल्यांसह पूर्ण भरलेले जे अर्ज महिला आणि बाल कल्याण संचालकाकडे सादर होतील, त्यांची प्राप्त अनुक्रमानुसारच छाननी करून, महिला आणि बाल कल्याण संचालक ते मंजूर करेल.

(5) सरकारने जाहीर केल्यानुसार अर्जदारास बँक / आर्थिक संस्थेच्या गोव्यातील एखाद्या शाखेत खाते खोलावे लागेल.

(6) विवाह नोंदणी झाल्यानंतर रक्कम मिळविण्यासाठी लाभार्थींना निर्धारित अधिकारी अथवा महिला आणि बाल कल्याण खात्याच्या संचालकांसमोर प्रत्यक्ष उपस्थित राहून रक्कम काढण्याचा आदेश / पत्र मिळवावे लागेल. सदर आदेश / पत्र संबंधित बँक / आर्थिक संस्थेत सादर करून रक्कम मिळवावी लागेल. विवाह नोंदणी दाखला (ज्यात प्रथम नोंदणी दाखल्याचाही समावेश असावा) सादर केल्यानंतरच रक्कम काढण्यासंबंधीचा आदेश / पत्र देण्यात येईल.

**5. अन्य अटी :** (1) लाभार्थीचा विवाहापूर्वी मृत्यू झाल्यास, संबंधित बँक / आर्थिक संस्थेने, कायम ठेवीतील रक्कम महिला आणि बाल कल्याण संचालकास परत करावी. संचालक ती रक्कम आवश्यक सरकारी खात्यात जमा करेल.

(2) या योजनेच्या कार्यवाहिसाठी सरकारतर्फे निर्धारित बँकेत / आर्थिक संस्थेत स्वतंत्र खाते उघडण्यात येईल. ती बँक / आर्थिक संस्थेने, महिला आणि बाल कल्याण संचालकाने वेळोवेळी दिलेली मान्यता / आदेशानुसार, अर्जदाराच्या नावे कायम ठेव तयार करावी लागेल.

(3) महिला आणि बाल कल्याण संचालक अथवा अन्य मान्यताप्राप्त अधिकाऱ्याने दिलेला रक्कम काढण्याचा आदेश / पत्र, लाभार्थीने बँक अधिकाऱ्यासमक्ष उपस्थित राहून सादर केल्यानंतरच कायम ठेवीतील रक्कम बँक / आर्थिक संस्थेतून काढता येईल.

(4) एका लाभार्थीस फक्त एकदाच या योजनेचा लाभ घेता येईल.

(5) लाभार्थीस न दिलेली रक्कम, तिच्या एकत्र झालेल्या व्याजासह सरकारी खात्यात पुन्हा जमा करावी लागेल. या रकमेवर कुटुंबातील अन्य कोणाचाच / संयुक्त सही करणारा / पालक (जसा प्रकार असेल तसा) यांचा कोणताही अधिकार / दावा असणार नाही.

(6) वयाची 40 वर्षे पूर्ण होईपर्यंत लाभार्थीने दावा केला नाही, तर कायम ठेव बंद करून, एकत्र झालेल्या व्याजासह सर्व रक्कम सरकारला परत करावी लागेल. संबंधितास अन्य कोणत्याही प्रकारचे साहाय्य देण्यात येणार नाही.

(7) महिला आणि बाल कल्याण संचालक अथवा वरील कलम 2(2) नुसार गठीत समितीने, छाननीनंतर एखादा अर्ज फेटाळल्यास त्या अर्जाबद्दल कोणताही वाद करता येणार नाही. या योजनेअंतर्गत एखाद्या व्यक्तीने अर्ज केला म्हणजे ती लाभ मिळविण्यास पात्र ठरली अथवा तिला तसा अधिकार

प्राप्त झाला, असे काही असणार नाही.

(८) वार्षिक अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेला निधी उपलब्ध असेल तरच या योजनेखाली लाभार्थीस रक्कम देण्यात येईल.

**6. सूट देण्याचा अधिकार :–** (1) या योजनेच्या कार्यवाहित येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी वरील कलम 2(2) नुसार चार सदस्यीय समिती गठीत करण्यात येईल.

(2) त्या समितीचा निर्णय अंतिम आणि सर्व संबंधितांस बंधनकारक असेल.

(3) या संपूर्ण योजनेत दुरुस्ती, सुधारणा करणे अथवा योजनेचा एखादा भाग अथवा पूर्ण योजनाच रद्द करणे हे अधिकार सरकारला असतील.

**गोवा राज्यपालांच्या आदेशाने आणि त्यांच्या नावे**

(सुनिल पी. मसुरकर)
**संचालक आणि सरकारचा पदसिद्ध जोड सचिव,**
**महिला आणि बाल कल्याण खाते**

**किंमत : 5 रुपये** **अ. क्र. -----**

**जोडपत्र –I** (बँक प्रत)

आमदार / खासदार / गोवा सरकारचा अतिरिक्त खास सचिव या हुद्द्या खालील नसलेला सरकारी अधिकारी यांनी सही केलेला अर्जदाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो.

## लाडली लक्ष्मी योजनेसाठी अर्ज

**भाग I**

1. * अर्जदाराचे नाव (मुलगी) .................................................................

2. * अर्जदाराची जन्म तारीख ....... / ......... / ............

3. * अर्जदाराचे नाव (i) आईचे : ...................................

(ii) वडिलांचे : .............................

(iii) पालकाचे : ...............................

4. विवाहित : होय / नाही

5. * निवासाचा पत्ता (पूर्ण) : ..............................................................................................

घर क्रमांक : ..............................................................................................

प्रभाग क्रमांक : ..............................................................................................

रस्ता / इमारतीचे नाव : ..............................................................................................

शहर / गाव : ..............................................................................................

मतदारसंघ : ..............................................................................................

तालुका : ..............................................................................................

जिल्हा : ..............................................................................................

पोस्ट कार्यालय : ..............................................................................................

पीन कोड : ..............................................................................................

6. * संपर्क माहिती (1) फोन क्र. ......................... (2) मोबाईल क्र. .........................

7. * धर्म हिंदु .............. मुस्लिम ................... क्रिश्चन ............ अन्य ................

8. वर्ग

(एससी / एसटी / ओबीसी / अन्य) : .............................................................................

9. रेशनकार्ड क्रमांक : .............................................................................

10. * आधारकार्ड क्रमांक : .............................................................................

11. ईपीक क्रमांक : .............................................................................

12. अन्य कोणतीही माहिती : .............................................................................

# प्रतिज्ञापत्र

मी, खाली सही करणारी, याद्वारे जाहीर करतो की, वर दिलेली सर्व माहिती योग्य आणि सत्य आहे. त्यात चुकीची माहिती नाही आणि **मी यापूर्वी या योजनेचा लाभ घेतलेला नाही**. एखादी माहिती / कागदपत्र बनावट अथवा चुकीचे असल्याचे सिद्ध झाल्यास त्याची पूर्ण जबाबदारी माझी स्वतःची असेल. त्यासाठी फौजदारी गुन्ह्यासह कायदेशीर कारवाई करण्याचे स्वातंत्र्य अधिकाऱ्यास असेल.

**(अर्जदाराचे नाव आणि सही)**

दि : ....... / ...... / .......

**यांच्या समक्ष सही केली :**

**सही, नाव आणि शिक्का**
**आमदार / खासदार, गोवा सरकारचा अतिरिक्त खास सचिव, या हुद्द्या खालील नसलेला सरकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी.**

**सूचना : * ही खूण असलेले मुद्दे आवश्यक आहेत.**

---

---

# फक्त कार्यालयीन वापरासाठी

**बँकेस अधिकारपत्र**

दि : ............................

प्रति,

शाखा व्यवस्थापक / अधिकृत अधिकारी

......................... ......................... (बँकेचे नाव)

महोदय,

कु. ................................................................. यांचा तपशील तपासलेला असून, त्यांना रु. 1,00,000 /– रोख / कायम ठेवीच्या स्वरुपात देण्याचा अधिकार आपणास देण्यात येत आहे.

**संचालक**

**महिला आणि बाल कल्याण संचालनालय**

**किंमत : 5 रुपये** **अ. क्र. -----**

**जोडपत्र –I (कार्यालय प्रत)**

आमदार / खासदार / गोवा सरकारचा अतिरिक्त खास सचिव या हुद्द्या खालील नसलेला सरकारी अधिकारी यांनी सही केलेला अर्जदाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो.

# लाडली लक्ष्मी योजनेसाठी अर्ज

**भाग I**

1. * अर्जदाराचे नाव (मुलगी) ..............................................................

2. * अर्जदाराची जन्म तारीख ....... / ......... / ............

3. * अर्जदाराचे नाव (i) आईचे : ..................................
   (ii) वडिलांचे : ...........................
   (iii) पालकाचे : ...............................

4. विवाहित : होय / नाही

5. * निवासाचा पत्ता (पूर्ण) : ............................................................

   घर क्रमांक : ............................................................
   प्रभाग क्रमांक : ............................................................
   रस्ता / इमारतीचे नाव : ............................................................
   शहर / गाव : ............................................................
   मतदारसंघ : ............................................................
   तालुका : ............................................................
   जिल्हा : ............................................................
   पोस्ट कार्यालय : ............................................................
   पीन कोड : ............................................................

6. * संपर्क माहिती (1) फोन क्र. ......................... (2) मोबाईल क्र. .........................

7. * धर्म हिंदु .............. मुस्लिम ................... क्रिश्चन ............ अन्य .................

8. वर्ग
(एससी / एसटी / ओबीसी / अन्य) : ............................................................

9. रेशनकार्ड क्रमांक : ............................................................

10. * आधारकार्ड क्रमांक : ............................................................

11. ईपीक क्रमांक : ............................................................

12. अन्य कोणतीही माहिती : ............................................................

# प्रतिज्ञापत्र

मी, खाली सही करणारी, याद्वारे जाहीर करतो की, वर दिलेली सर्व माहिती योग्य आणि सत्य आहे. त्यात चुकीची माहिती नाही आणि **मी यापूर्वी या योजनेचा लाभ घेतलेला नाही**. एखादी माहिती / कागदपत्र बनावट अथवा चुकीचे असल्याचे सिद्ध झाल्यास त्याची पूर्ण जबाबदारी माझी स्वतःची असेल. त्यासाठी फौजदारी गुन्ह्यासह कायदेशीर कारवाई करण्याचे स्वातंत्र्य अधिकाऱ्यास असेल.

**(अर्जदाराचे नाव आणि सही)**

दि : ....... / ...... / .......

**यांच्या समक्ष सही केली :**

**सही, नाव आणि शिक्का**
**आमदार / खासदार, गोवा सरकारचा अतिरिक्त खास सचिव, या हुद्द्या खालील नसलेला सरकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी.**

**सूचना : * ही खूण असलेले मुद्दे आवश्यक आहेत.**

## भाग II

अर्जासोबत पुढील दाखले सादर करावे लागतील.

1. अर्जदाराचा स्वःप्रमाणित जन्मदाखला.

2. अर्जदाराचा निवास दाखला. निवास दाखल्याच्या बदली पूर्वीची शाळा सोडल्याचा दाखला आणि मुलगी सध्या शिक्षण घेत असलेल्या मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेचे अधिकृत विद्यार्थी प्रमाणपत्र सादर करता येईल. असे असले तरीही, शाळा मध्येच सोडलेल्या मुलीनी शाळा सोडलेल्या दिवसापासून ते 18 वर्षे पूर्ण / विवाह होईपर्यंतचा (जे लागू असेल ते), निवास दाखला सादर करता येईल. पदवीधर असल्यास दहावी, बारावी आणि पदवी प्रमाणपत्र एवढा पुरावा पुरेसा असेल.

3. रेशनकार्डाची स्वःप्रमाणित प्रत.

4. आधारकार्डाची स्वःप्रमाणित प्रत.

5. विवाह नोंदणी प्रमाणपत्राची स्वःप्रमाणित प्रत. (यात विवाह नोंदणीच्या प्रथम दाखल्याचा समावेश असू शकतो).

6. अर्जदाराच्या कोणत्याही एका पालकाच्या 15 वर्षे अथवा 25 वर्षे, यापैकी जे लागू असेल ते, निवास दाखल्याची स्वःप्रमाणित प्रत.

या दाखल्याच्या बदली, निर्धारित कालावधीसाठी निवास असल्याचे सिद्ध करणारा अन्य कोणताही पुरावा, ज्यात पुढील दाखल्यांचा समावेश असू शकतो.

i. भू नोंदणी कागदपत्र. कुळ हक्क, मुंडकार हक्क, ताबा हक्क, आदि.

ii. रोजगार प्रमाणपत्र, अथवा.,

iii. समितीचे समाधान होईल असा अन्य कोणताही दाखला.

7. अर्जदाराच्या कोणत्याही एका पालकाच्या जन्म दाखल्याची स्वःप्रमाणित प्रत.

जन्म दाखला उपलब्ध नसल्यास, पालक / पालकांची जन्म तारीख आणि जन्मस्थान सिद्ध करणारा पुढे नमूद एखादा दाखला सादर करता येईल.

i. बाप्तीज्म दाखला,

ii. पालक / पालकांचा शाळा सोडल्याचा दाखला,

iii. पालक / पालकांनी जन्म तारखेचा जो दावा केला आहे, त्यादरम्यान अर्जदार तरुणीचे आजोबा अथवा आजी यापैकी एखाद्याचा निवास गोव्यात होता हे सिद्ध करणारा एखादा दाखला अथवा.,

iv. पालक / पालकांची जन्म तारीख सिद्ध करणारा अन्य कोणताही दाखला.

8. 20 रुपयांचा स्टॅम्पपेपर / खास ॲडेसिव्ह स्टॅम्प चिकटवून जोडपत्र–II मधील प्रतिज्ञापत्र.

9. रेव्हेन्यू स्टॅम्प चिकटविलेली निर्धारित नमुन्यातील पोच–पावती (डुप्लीकेट प्रतिसह)

---

## जोडपत्र – II

(रिक्त जागा भरा आणि लागू नसलेले खोडा)

(20 रुपयांच्या स्टॅम्प पेपरावर वा 20 रुपयांचा खासा ॲडेसिव्ह स्टॅम्प चिकटवा)

# प्रतिज्ञापत्र

मी .................... श्री ....................... यांची कन्या, वय ........... भारतीय नागरिक ...................... येथे राहाणारी शपथपूर्वक असे निवेदन करते की,

1. 'लाडली लक्ष्मी योजने' अंतर्गत आर्थिक साहाय्यासाठी मी अर्ज केला.

2. माझा जन्म दि. ..... / ....../ ....... रोजी ............... राज्यातील ......................... येथे झाला.

3. दि. ..... / ....../ ....... रोजी मी वयाची 18 वर्षे पूर्ण केली असून माझे वय 40 वर्षपेक्षा जास्त नाही.

4. मी ................ धर्मीय आहे.

5. मी एससी / एसटी / ओबीसी / अन्य गटातील आहे.

6. वरील पत्त्यावर गत ......... वर्षांपासून माझे वास्तव्य आहे आणि गत ....... वर्षांपासून मी गोव्याची नागरिक आहे.

7. माझे वडिल / आई ..................... (वडिल / आई यांचे नाव) गोव्यात जन्मलेले आहेत आणि तेही गत ......... वर्षांपासून गोव्याचे नागरिक आहेत.

8. माझे वडिल / आई ..................... (वडिल / आई यांचे नाव) गत ...... वर्षांपासून गोव्याचे नागरिक आहेत.

9. गोव्यातील ........................ (शैक्षणिक संस्थेचे नाव आणि पत्ता) ........... पासून ............. पर्यंत मी शिक्षण घेतले / सध्या शिकत आहे.

दि : ....... / ......../ ............ रोजी मी शपथपूर्वक विधान करते.

**सही करणारी**

**यांच्या समक्ष :**

**अ. क्र.-----**

# पोचपावती

लाडली लक्ष्मी योजनेअंतर्गत आर्थिक साहाय्य म्हणून, महिला आणि बाल कल्याण संचालक, पणजी यांच्याकडून रु. 1,00,000 /– (रुपये एक लाख फक्त) कायम ठेव / रोख स्वरुपात मिळाले. धन्यवाद.

रु. 1 चा
रेव्हेन्यू स्टॅम्प

नाव : ______________________

पत्ता : ______________________

दि. : ______________________

स्थळ : ______________________

---

**अ. क्र. ------**

# पोचपावती

लाडली लक्ष्मी योजनेअंतर्गत आर्थिक साहाय्य म्हणून, महिला आणि बाल कल्याण संचालक, पणजी यांच्याकडून रु. 1,00,000 /– (रुपये एक लाख फक्त) कायम ठेव / रोख स्वरुपात मिळाले. धन्यवाद.

नाव : ______________________

पत्ता : ______________________

दि. : ______________________

स्थळ : ______________________